भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७३४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २८/१०/२०१७

**१) मोटार सायकलची चोरी. :–**

दिनांक २४/१०/२०१७ चे १३.३० ते १४.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी हा मोटार सायकल क्र एमएच ४९/एल २४८७ नी पवनीचे आठवडी बाजारात आला असता, त्याने त्याचे मोटार सायकल लक्ष्मी रमा सभागृह समोर हॅन्डल लॉक करून ठेवलेली असता, कुणीतरी अज्ञात चोरानी कुणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादीची अंदाजे कि. ४४,६५६/रु ची मोटार सायकल चोरून नेल्याने फिर्यादी नागोराव नामदेव रामटेके वय ४२ वर्ष रा. गायडोंगरी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**२) हिरो होन्डा कंपनीची स्प्रिंट नेक्सट सायकलची चोरी. :–**

दिनांक २५/१०/२०१७ चे १८.३० ते १४.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी विजय अभिमन्य बाबरे वय ४७ वर्ष रा. विदर्भ हाउसींग सोसायटी (कॉलनी) भंडारा यांचे घरासमोर एक हिरो होन्डा कंपनीची स्प्रिंट नेक्सट लाल रगांची २४ इंच सायकल कि. ६,३००/रु ची ठेवुन बाजारात गेला असता, कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याने फिर्यादी तक्रारी वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चेके पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) आलमारीत ठेवलेल्या बॅगमधील नगदी पैशाची चारी. :–**

दिनांक २६/१०/२०१७ चे १६.०० ते दि. २७/१०/२०१७ चे ०८.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी हणुवंत भाऊराव कांबळे वय ३६ वर्ष रा. श्रीराम नगर तुमसर हा बाहेरगावी घराला लॉक करून गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने घराचे मागील दार तोडुन आत प्रवेश करून घरातील आलमारीत ठेवलेल्या बॅग मधील १०/रु प्रमाणे १०० सिक्याचे ५ बंडल प्रत्येकी १०००/रु प्रमाणे एकुन कि. ५,०००/रु नगदी चा माल चोरून नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**४) भांडण करून डोक्यावर विट मारून इसमास जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २६/१०/२०१७ चे १६.०० ते १३.४५ वाजता. दरम्यान यातील आरोपी हा दारू पाणी पिऊन येवुन फिर्यादीस विनाकारण शिवीगाळ भांडण करून, फिर्यादीचे डोक्यावर विट मारून जखमी केल्याने, फिर्यादी नितीन सिध्दार्थ कुंभरे वय ३० वर्ष रा. सुभाष वार्ड माडगी यांचे तोंडी वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३२४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चिचखेडे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**५) ट्रॅव्हल्स पलटी होवुन पाच जखमी:–**

दिनांक २६/१०/२०१७ चे २१.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी अणुपम श्रीमुचंद ऊईके वय ३१ वर्ष रा. कचेरी चौक डोंगरगड जिल्हा राजनांदगाव (छत्तीसगड) फिर्यादी व २४ ते २५ लोक मिळुन डोंगरगड येथुन ट्रॅव्हल्स क्र. सीजी ०१ एम ०४३१ ने देवदर्शना करता शिर्डी येथे जात असतांनी पिंपरी पुर्नवसन एनएच ६ रोडवर यातील आरोपीने त्याचे ताब्यातील ट्रॅव्हल्स ही भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन डिवायडरला धडक मारून ट्रॅव्हल्स पलटी होवुन आरोपी स्वत: व ४ प्रवासी यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी तोंडी वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४ /१७७ मोवका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**६) ट्रॅव्हल्सची स्कुल बसला धडक लागुन नुकशान केल्याने गुन्हा नोंद–**

दिनांक २७/१०/२०१७ चे १५.३० वाजता. दरम्यान यातील आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे ताब्यात असलेली स्कुल बस क्र. एमएच३६ एफ २०६१ ला मागेहुन धडक मारून स्कुल बसचे नुकशान करून घटणा स्थळावरून पळुन गेल्याने फिर्यादी मिलींद शामराव मोटघरे वय ४३ वर्ष रा. कोंढा यांचे तोंडी वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४ १३४ मोवका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. भोगे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**७) अधांरात आपले अस्तीत्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद–**

दिनांक २७/१०/२०१७ चे २१.०० वाजता. दरम्यान यातील आरोपी हे एकांत वासातील खुल्या घरात आपले अस्तीत्व लपवुन अंधारात बसुन दखलपात्र गुन्हा करण्याचे बेताने मिळुन आल्याने यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १२२ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.आरोपी अटक आहे.

**८) अवैध दारू अंडयावर धाडी . :–**

दिनांक २७/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन मोहाडी, तुमसर, गोबरावाही, व साकोली येथे अवैध दारू अंडयावर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २८ लिटर हातभट्टी दारू रु नगदी १०१०/–रु.+ साहीत्य कि. ५,०८०/रु व १ लिटर ९८० मिली देशी दारू कि. ५५०/रु असा एकुण ५,६३०/रु. चा माल जप्त करण्यात आला.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता